## गौरव

कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या सबज्युनिअर राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धेत महाराष्ट्राला उपविजेते पद मिळाले. राष्ट्रीय स्पर्धेत चंद्रपुर डिस्ट्रिक्ट ग्लोबल स्पोर्टस क्लब, उर्जानगर सी. टी. पी. एस. चंद्रपूरचा चि. आकाश संजय शिंदे याने महाराष्ट्रातील संघामध्ये चांगल्या प्रकारे नेतृत्व केले चि. आकाश हा पर्यावरण गुणवत्ता मंडळाचे सदस्य असलेले संजय आत्माराम शिंदे यांचा मुलगा आहे.

जुलै महिन्यात जपान येथे होणा-या ऑल जपान न्यू क्यू शोरीन तर्फे आयोजित स्पर्धेसाठी कोराडीच्या सूरज गोडे (ब्लॅक बेल्ट व डॉन) व किशोर देबनाथ (ब्लॅक बेल्ट व डॉन) यांची निवड झाली आहे. कोराडी वीज केंद्रात कार्यरत असलेले श्री. अरविंद रामरावजी गोडे (कारागिर 'अ') यांचा सुरज गोडे हा मुलगा असून किशोर देबनाथ यांचे वडील कोराडी वीज केंद्रातून सेवानिवृत्त झाले आहेत.

अभिनंदन

## परळी औ. वि. केंद्रातील कर्मचाऱ्यांचा गौरव

परळी औ. वि. केंद्रातील खालील कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल महाव्यवस्थापक -२ यांनी या कर्मचाऱ्यांना प्रशस्ती पत्र देवून गौरविले आहे.

श्री.पी.एम.वाठोरे (कनिष्ठ अभियंता)विद्युत संधारण विभाग टप्पा २

श्री.एस.के.चौधरी(कारागीर अ) विद्युत संधारण विभाग टप्पा २

श्री.एस.जे.बोराले (कारागीर ब) विद्युत संधारण विभाग टप्पा २

श्री.एस.बी.मुंडे (कारागीर ब)विद्युत संधारण विभाग टप्पा २



औष्णिक वीज केंद्र, परळी वैजनाथ येथील कनिष्ठ अभियंता श्री. खंडेलोटे यांची महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या (तिन्ही कंपनी) कर्मचारी कल्याण निधी समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



परळी औष्णिक वीज केंद्रात कार्यरत असलेले श्री. अशोक अवचार, उप. कार्यकारी अभियंता यांचा मुलगा चि. अभय याने आय.आय.टी.जे.ई.ई. २००९ च्या परिक्षेत यश संपादन केले असून (ऑल इंडिया रँक) अखिल भारतीय पातळीमध्ये ४७१ क्रमांकाने पास झाला आहे.



भुसावळ औष्णिक वीज केंद्र येथे कारागीर-अ, संचालन-२ या विभागात कार्यरत असलेले. श्री. जगन्नाथ गणपत चौधरी यांचा चि. प्रशांत जगन्नाथ चौधरी हा राष्ट्रीय औषधीय शिक्षा एवं अनुसंधान संस्थान, कोलकत्ता (पश्चिम बंगाल) (NIPER) येथून एम-फार्म (M. Pharm) च्या अंतिम परिक्षेत ८० गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला असून पुढील शिक्षणासाठी करिता (Ph.D) अभ्यास सुरु आहे.

## चंद्रपूर येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त "घोषवाक्य स्पर्धा

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात जागतिक पर्यावरण दिन साजरा करताना कर्मचाऱ्यांकरिता "घोषवाक्य स्पर्धा" आयोजित केली होती. मुख्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्युत केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. विजय सिंह होते. प्रमुख पाहूणे म्हणून श्री. व्ही. व्ही. शिंदे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ, चंद्रपूर तर प्रमुख वक्ते एम. ई. एल चे कार्यकारी संचालक श्री. डी. पाल उपस्थित होते. मंचावर महाव्यवस्थापक सर्वश्री कार्तिक वाघमारे, सिध्दार्थ वाघमारे, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. हरीदास चौधरी उपस्थित होते. वसाहतीत याप्रसंगी वृक्षारोपण करण्यात आले. सदर कार्यक्रमात खालील कर्मचाऱ्यांना घोषवाक्य स्पर्धेच्या विजेत्यानी पुरस्कार पटकावले.

**प्रथम पुरस्कृत घोषवाक्य**

"जलप्रदुषण, वायु, प्रदुषणापासुन वाचवा वसुंधरा !
कमीत कमी पाच झाडे लावून त्यांचे संवर्धन करा!!"

**प्रथम विजेते - श्री. दिनकर यादव मशाखेत्री**

- कारागीर क, टर्बाईन बेसमेंट संच ७

**द्वितीय पुरस्कृत घोषवाक्य -**

"फुले, झाडे आणि वेली ज्यांचे दारी !
पर्यावरण संवर्धनाची तिच पहिली पायरी !!"

**द्वितीय विजेते - श्री. सुरेश परशरामजी रेवतकर**

- लघुलेखक, चंद्रपूर म.औ.वि.केंद्र

**तृतीय उत्तेजनार्थ पुरस्कृत घोषवाक्य -**

"मनुष्याच्या दुर्लक्षामुळेच पर्यावरण संतुलनाची
आता सीमा संपत आहे!
भविष्यातील त्याच्या भयंकर परिणामाची चाहूल
आताच तर लागत आहे !!"

**विजेते - श्री. खेमदेव कन्नमवार,**

- कारागीर क, टी आय सी २, चं म औ वि केंद्र

**हिन्दी विभाग घोषवाक्य-**

"डालीये सबके जीवनपर सुखोंका आवरण!
बचाकर संभालकर अपना पर्यावरण !!"

**विजेते - श्री. ए. एस. शुक्ला**



भुसावळ औष्णिक वीज केंद्रात वाहन चालक म्हणून कार्यरत असलेले श्री. सोमा कृष्णा बऱ्हाटे यांचे चिरंजीव कु. गिरीश सोमा बऱ्हाटे हा मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शिवाजीनगर, पुणे येथून बी.ई (इलेक्ट्रिकल) ची पदवी फर्स्ट क्लास विथ डिस्टींक्शन मध्ये पास होऊन पुणे येथील इन्फोसिस कंपनीत रुजू झाले आहेत.

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे येथील नियोजन कक्ष, संचलन टप्पा क्र.१ येथील कार्यरत कनिष्ठ अभियंता सौ.वैशाली चंद्रकांत धोंडगे यांची कन्या कु. ऋचा हिने राज्य माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २३७ गुण मिळवून नाशिक जिल्हा गुणवत्ता यादीत १२ वा क्रमांक मिळवला.